## प्रेसनोट दि ३०/०३/२०१९

## कोथरुड पोलीस स्टेशन पुणे शहर

## मंचर पोलीस स्टेशन कडील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेतलेबाबत

दि.२९/०३/२०१९ रोजी दुपारी ११.०० वा.चे सुमारास सहा.पोलीस उप-निरीक्षक, शिंदे यांना त्याचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मंचर पोलीस स्टेशन पुणे ग्रामिण येथील गुन्हयातील पाहीजे आरोपी सोन्या ऊर्फ जयराम ऊर्फ विक्रम दादाभाऊ शेलार,वय २९ वर्षे,रा.नारायणगाव पुणे हा शिवाजीनगर कोर्ट पुणे याठिकाणी येणार असलेबाबत समजल्याने वपोनि कोथरुड पो स्टे पुणे व पो नि गुन्हे कोथरुड पो स्टे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि संतोष पाटील व स्टाफ यांनी शिवाजीनगर कोर्टाचे बाहेर ट्रॅप लावला असता,आरोपी सोन्या ऊर्फ जयराम ऊर्फ विक्रम दादाभाऊ शेलार हा सदर ठिकाणी आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे विचारपुस करीता नमुद आरोपी याने सन २०१५ मध्ये मंचर स्टॅण्ड समोरुन हॉस्पीटलच्या जवळुन बुलेट मो सा नं एम एच १४ ई एन ८६०० ही चोरली असलेबाबत माहीती सांगीतली. त्याबाबत मंचर पोलीस स्टेशनशी संपर्क करुन माहीती प्राप्त करीता सदर बुलेट चोरीबाबत मंचर पो स्टे गुरनं.४५/२०१८ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. नमुद आरोपी यास १५/०० वा. ताब्यात घेवुन त्यास मंचर पोलीस स्टेशनकडील पोलीसांचे ताब्यात पुढील योग्य ती कार्यवाही करणे देण्यात आलेले आहे

अशा प्रकारे कोथरुड पो स्टे कडील पोउनि संतोष पाटील व स्टाफ यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

**(प्रतिभा जोशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुणे